# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १८२ वा ❑ भारतीय सौर दिनांक १२ भाद्र. शके १९४८, गुरूवार दि.०३ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### समृद्धी की दहशतीचा मार्ग?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती देण्यासाठी आणि मुंबई ते नागपूर हे दोन शहरांमधील अंतर कमी करण्याच्या महत्त्वाकांक्षी हेतूने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग उभारण्यात आला. सुरुवातीच्या काळात या महामार्गाला राज्याची भाग्यरेषा म्हणून मोठ्या अभिमानाने आणि दिमाखात नावारूपाला आणले गेले. गुळगुळीत रस्ते, ताशी १२० किलोमीटरची वेगमर्यादा आणि प्रवासाच्या वेळेत होणारी प्रचंड बचत यामुळे संपूर्ण राज्यातील प्रवाशांचा मोठा ओढा या महामार्गाकडे होता. मात्र, आता या वेगाच्या आकर्षणाची जागा मृत्यूच्या भयाने आणि दरोडेखोरांच्या क्रूर थराराने घेतली आहे. मार्च २०२३ ते २०२६ या केवळ तीन वर्षांच्या अल्प कालावधीत या महामार्गावर तब्बल १५ हून अधिक लुटमारीच्या आणि सशस्त्र दरोड्याच्या गंभीर घटना घडल्या आहेत. कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेला हा जागतिक दर्जाचा महामार्ग आता सर्वसामान्यांसाठी अक्षरशः दहशतीचा मार्ग बनला असून, प्रवाशांच्या मनात या प्रवासाविषयी मोठी दहशत आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

नाशिकच्या सिन्नरजवळ छत्रपती संभाजीनगरच्या मिश्रा कुटुंबासोबत घडलेला प्रसंग केवळ महामार्गावरील सुरक्षा व्यवस्थेचीच नव्हे, तर आजच्या वेगवान जगात हरपलेल्या माणुसकीचीही अत्यंत विदारक चिरफाड करणारा आहे. मध्यरात्रीच्या भयाण अंधारात दरोडेखोरांनी या कुटुंबाची गाडी अडवून त्यांना चारही बाजूंनी घेरले आणि तब्बल २५ मिनिटे हा मृत्यूचा भयानक थरार महामार्गावर सुरू होता. या संपूर्ण घटनेतील सर्वात अस्वस्थ करणारी बाब म्हणजे, मदतीसाठी मिश्रा कुटुंबीय काकुळतीला येऊन विनवण्या करत असताना, महामार्गावरून प्रत्येक सेकंदाला अनेक वाहने सुसाट वेगाने जात होती, पण एकाही गाडीच्या चालकाने थांबून मदत करण्याची तसदी घेतली नाही. या वेगाच्या शर्यतीत लोकांची संवेदनशीलता आणि माणुसकीही कुठेतरी निघून गेली आहे, हेच यातून अधोरेखित झाले. सलग तीन अशा गंभीर घटना घडल्यानंतर आता कुठे पोलिस आणि महामार्ग प्रशासन खडबडून जागे झाले असले तरी, प्रवाशांच्या मनात खोलवर रुजलेली दहशत एकाएकी दूर करणे हे प्रशासनासाठी मोठे आव्हान बनले आहे.

आता दरोडेखोरांची हिंमत इतकी वाढली आहे की, केवळ रात्रीच्या अंधारातच नव्हे, तर दिवसाढवळ्याही प्रवाशांना लुटले जात आहे. २६ ऑगस्टला दुपारी चारच्या सुमारास वैजापूर जवळील एक्झिट क्रमांक १८ (हडसपिंपळगाव) जवळ राहुरीचे उद्योजक साहिल सोनवणे यांची गाडी अडवून दरोडेखोरांनी अडीच तोळ्याची सोन्याची साखळी भरदिवसा लुटली. या वाढत्या गुन्हेगारीची दखल घेत पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आणि किरण अजिनाथ गायकवाड याला अटक केली. त्याच्या सखोल चौकशीतून एक धक्कादायक माहिती समोर आली ती म्हणजे, या महामार्गावर धुमाकूळ घालणारी ८ ते १० कुख्यात गुन्हेगारांची एक संघटित टोळी कार्यरत असून, हे सर्व गुन्हेगार बीड आणि पाथरी परिसरातील आहेत. या सराईत टोळीच्या मुसक्या आवळण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेची चार आणि वैजापूर पोलिसांचे एक अशी एकूण पाच विशेष पथके रवाना झाली असून, वरिष्ठ पोलिस अधिकारी स्वतः या शोधमोहिमेवर लक्ष ठेवून आहेत.

या वाढत्या आणि संघटित गुन्हेगारीमागे केवळ पोलिसांचेच नव्हे, तर टोल प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष सर्वात जास्त कारणीभूत आहे. महामार्गावर अनधिकृत व्यक्ती किंवा जनावरे येऊ नयेत म्हणून दुतर्फा उभारलेले लोखंडी सुरक्षा कुंपण अनेक ठिकाणी जाणीवपूर्वक तोडण्यात आले आहे. दरोडेखोर याच तुटलेल्या कुंपणातून आत प्रवेश करतात. याशिवाय, महामार्गाच्या कडेला वाढलेले मोठे गवत आणि दाट झाडी-झुडपे लुटारूंना अत्यंत सुरक्षित आडोसा देत आहेत.

सर्वात संतापजनक बाब म्हणजे, प्रवाशांकडून हजारो रुपये टोल वसूल केला जात असतानाही महामार्गावरील अनेक महत्त्वाचे पट्टे ब्लाइंड स्पॉट बनले आहेत. तिथे ना सीसीटीव्ही कॅमेरे आहेत, ना आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी एसओएस यंत्रणा कार्यान्वित आहे. एखादा जीवघेणा प्रसंग ओढवल्यास तात्काळ पोहोचणारी टोल कंपनीची क्विक रिस्पॉन्स टीम केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याचे दिसते. कोट्यवधींचा टोल गोळा करणाऱ्या प्रशासनाने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी खाजगी सुरक्षारक्षक नेमणे अपेक्षित असताना, त्याकडे सोयीस्कर डोळेझाक केली जात आहे.

पोलिसांची किंवा महामार्ग सुरक्षा रक्षक दलाची पुरेशी गस्त नसणे, हा यातील आणखी एक मोठा दोष आहे. पोलिसांनी एका आरोपीला अटक करून तपासाला जरी गती दिली असली तरी, ''समृद्धीवरून खरंच प्रवास करावा की नाही?'' हा रास्त प्रश्न आता प्रत्येक प्रवाशाला सतावत आहे. केवळ गुळगुळीत रस्ते बांधले म्हणजे खरा विकास नव्हे. जोपर्यंत महामार्गावरील तुटलेले सर्व कुंपण तातडीने दुरुस्त होत नाही, अंधाऱ्या पट्ट्यांमध्ये १०० टक्के सीसीटीव्ही आणि पथदिव्यांचे जाळे विणले जात नाही, टोल कंपन्यांची जबाबदारी निश्चित केली जात नाही आणि जोपर्यंत २४ तास पोलिसांच्या गाड्यांचे सायरन या रस्त्यावर घुमत नाहीत, तोपर्यंत समृद्धी महामार्ग हा प्रवाशांसाठी नव्हे तर दरोडेखोरांचाच समृद्ध अड्डा राहील. प्रवाशांचा हरपलेला विश्वास पुन्हा मिळवणे आणि महामार्गावरील प्रवास खऱ्या अर्थाने सुरक्षित करणे, हेच आता राज्य सरकार आणि प्रशासनासमोरील सर्वात प्राधान्याचे उद्दिष्ट असायला हवे.

# सीएसएमएसएसमध्ये २६ वे क्वालिटी सर्कल संमेलन

## गुणवत्तेच्या स्पर्धेत हिंदुस्तान एरोनॉटिक्स व कॅनपॅक इंडिया लिमिटेड अव्वल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : सीएसएमएसएस छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग येथे क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने आयोजित २६ वे संमेलन उत्साहात पार पडले. महाराष्ट्रासह देशातील विविध २०० हून अधिक कंपन्यांच्या ६०० पेक्षा अधिक उद्योग प्रतिनिधीनी सहभाग नोंदवत आपल्या गुणवत्ता सुधारणा, नवकल्पना व समस्या निराकरणाच्या प्रकल्पांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जेएसडब्ल्यू मोटर्सचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. रवी अंडावर्पू यांच्या हस्ते झाले. बक्षीस वितरण एंड्युरन्स टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे श्री. राजेश जैन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विप्रो कन्झ्युमरचे वरिष्ठ व्यवस्थापक, श्री. राजेश मोरखंडीकर, सीएसएमएसएस चे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे तसेच  चे पश्चिम विभागाचे संचालक श्री. नितीन किंनगावकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या स्पर्धेत हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (), नाशिक आणि कॅनपॅक इंडिया लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर यांच्या संघांनी उल्लेखनीय कामगिरी



करत विजेतेपद पटकावले. या यशामुळे दोन्ही विजेते संघ राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरले असून, डिसेंबर २०२६ मध्ये भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय संमेलनात ते सहभागी होणार आहेत.

क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाचे चेअरमन श्री. संजय वैद्य यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात छत्रपती संभाजीनगर चॅप्टरकडून गुणवत्ता सुधारणा आणि नवकल्पनांसाठी सातत्याने करण्यात येणाऱ्या विविध प्रयोगांची माहिती दिली. तसेच, जागतिक स्तरावरील विविध समस्या क्वालिटी सर्कलच्या माध्यमातून प्रभावीपणे कशा सोडविता येतात, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

उपस्थित मान्यवरांनी उद्योग, शिक्षण व विविध क्षेत्रांमध्ये गुणवत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. सतत सुधारणा, नवकल्पना आणि समस्या निराकरणाची संस्कृती ही आजच्या स्पर्धात्मक युगाची गरज आहे, असा संदेश त्यांनी स्पर्धकांना दिला.

सामाजिक दायित्वाचा भाग म्हणून रुग्णांची निःस्वार्थ सेवा करणाऱ्या आणि गरजू रुग्णांना सर्जिकल व विविध आवश्यक वस्तू विनामूल्य उपलब्ध करून देणाऱ्या रुग्ण सेवा मंडळाचा ग्रामसेवक स्व. जी एम वाघमारे विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला व सायबर क्राईम विभागाचे श्री कादिर देशमुख यांचे वाढत्या सायबरक्राइम पासून सुरक्षा कशी बाळगावी या बद्दलचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या अधिवेशनाचे औचित्य साधून, सामाजिक बांधिलकी जपत सीएसएमएसएस च्या आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सीएसएमएसएस चे अध्यक्ष मा. श्री. रणजीत मुळे आणि संस्थेचे सचिव मा. श्री. पद्माकररावजी मुळे यांनी आयोजकांचे तसेच सहभागी सर्व औद्योगिक संघांचे अभिनंदन केले. समाजाच्या आणि उद्योगजगताच्या प्रगतीसाठी अशा ज्ञानवर्धक व गुणवत्ताविषयक उपक्रमांच्या आयोजनासाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था सदैव सर्वतोपरी सहकार्य करीत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.  संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प प्रमुख अमोल गिरमे, प्रवक्ता डॉ. नरेंद्र जोशी, सचिव संदीप गरुड, सुधीर पाटील, मंगलदास चोरगे, अश्विनी देऊळकर, योगिता बोरुडे, डॉ. अस्मिता जोशी, राहुल देशपांडे, हेमंत सोनवणे, नितीन जोशी, अभिषेक पाटील, हनुमंत कदम, शेख खाजा, आर. डी. पवार, महेंद्र वानखेडे, सरिता पारधी, संदीप असावा तसेच छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर देवेंद्र भुयार यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संजय कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोज मते यांनी केले.

# पुढे काय? ज्येष्ठांची समस्या...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ज्येष्ठांनी गोवत्स न्यायाचा<br>
सदैव अंगीकार करावा<br>
शैली बदलून वागण्याची<br>
आनंदाची पर्वणी गाठावी

अशी ज्येष्ठांसाठी ची मार्गदर्शक कविता नुकतीच माझ्या वाचनात आली. त्याचा पदर पकडून मला असे वाटते की ज्येष्ठानी त्यावर विचार करून  आळस निष्काळजीपणा न करता वास्तवात असलेल्या जीवन जगण्याचा प्रयत्न करावा . गोवत्स न्यायाचा मोकळ्या विचारानी अवलंब करावा. गोवत्स न्यायाचा अर्थ एव्हडाच आहे की गायी बरोबर वासरू असतेच. म्हणजे आपली जीवन शैली सकारात्मक विचारा कडे जर बदलली तर इतर लाभ ही आपल्याला आपोआप मिळतील आणि जीवना मध्ये आनंदी वातावरण आपोआप निर्माण होईल.

आजकाल प्रत्येक व्यासपिठावर ज्येष्ठांच्या वर्तमान स्थितीची चर्चा मोठ्या चविने होत असते. समाजाच्या दृष्टीने ही समस्या विचार प्रवर्तक वाटते. कारण सर्वानाच त्या मार्गातून प्रवास करावा लागणारा असतो. त्यामुळे आज जे सुपात आहेत त्यांनाही ही बाब भेडसावत असते. ज्येष्ठ मंडळीना वाढत्या वयात प्रतिकूल परिस्थितीतून सुखाने जीवन जगण्याची वाट शोधावी लागत आहे. ह्याची अनेक नवनवीन प्रकारची अकल्पित उदाहरणे आपल्या समोर येत असत्तात आणि मिडियाच्या माध्यमातून उलट सुलट चर्चा ही होत असतात मत -मतांतरा चे दर्शन त्यातून होत असते. अनेक ज्येष्ठ मंडळीना सुखा पेक्षा दुःखच पदरी पडते. अनेकांच्या पदरी कौटुंबीक वागणूकी मुळे अनेक वृद्धाश्रम भरभरून वहात आहेत. पैसा घ्या पण आमच्या आई वडिलांना सांभाळा त्यांची काळजी घ्या अशी सुशिक्षीत तरुणांची वृत्ती त्यांच्या करियर करण्याच्या व्यस्त जीवन शैलीतून निर्माण झालेली आहे. अर्थात ही कटू पण सत्य परिस्थिती कोणालाही नाकारता येत नाही. वास्तव लपविताही येत नाही. मागील



तीनचार दशकात ज्येष्ठ आर्थिक संकटात असत तरी त्यांना कौटुंबीक सुखापासून वंचित रहावे लागत नसे. दुधावरच्या सायी बरोबर मिळून मिसळून आनंदाच्या तुषाराने मन भरून जात असे , प्रसंगी आनंदाच्या लाटा सर्वकुटूबांत मनोमन पसरत असत, तेव्हा ज्येष्ठ काही काळापुरते तरी नैराश्या पासून दूर रहात असत. सुना भावजया, बहिणी . आत्या मामी, त्यांची काळजी घेवून बडदास्त ठेवत





असत कारण एकत्र कुटुंब पद्धती होती प्रसंगी देव धर्मा ज्येष्ठ गुंतून रहात असत मग त्याना नैराश्यात जाण्यासाठी वेळच उरत नसत कारण समाधान पोषक वातावरण असायचे, शिवाय भारतीय सण वार गुणा गोविंदाने परस्पर आनंदाने साजरे व्हायचे . घराच्या आनंदी वातावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येक जण वेळ देण्याला प्राधान्य द्यायचे पण आता विभक्त कुटुंब पद्धतीचा बोलबाला असल्यामुळे तशी परिस्थिती राहिली नाही. मुबलक पैसा प्रत्येकाच्या पदरी असल्यामुळे भोग विलास प्रवाहा कडे समाजीक सद्य पिढी जात आहे. त्यामुळे आजी-आजोबा च्या अनुभव संपन्न संस्कारित गोष्टी ऐकण्यास गोष्टीचे मूल्य लक्षात घेण्यात अन स्वतः आनंदी होण्यात रस राहिला नाही. आजी आजोबा पेक्षा मोबाईल च्या कक्षेत तरुणाईला सुखाचा स्पर्ष वाटतो काही प्रमाणात नूतन तंत्रज्ञानाचा वापर करण्यास हरकत नाही कारण ती काळाची गरजच आहे. पण त्याच्यातच गुंतुन राहणे योग्य आणि लाभदायक वाटत नाही. तरुणाना हे सांगणे योग्य असे त्यांच्या पालकाना मनातून वाटत असते पण त्यांच्या व्यस्त जीवन शैलीत त्यांना ते शक्य होताना दिसत नाही. आणि ज्येष्ठांना योग्य प्रतिसाद मिळत नाही म्हणून ते अंतर्गत दुःखात जातात. आजोबाची शिकवण चांगलीअसूनती कालबाह्य झाली आहे ह्या सबबीवर बहुंशी मुले टाळतात .

विद्यमान परिस्थिती मध्ये शाळेत काय चालते ह्याची बहुंशी पालकाना कल्पना आहे. छडी लागे छमछम हा काळ मागे पडला आहे म्हणून मुलांना धाक राहिला नाही अन् शिस्तीचा बोजवारा उडाला आहे. शिक्षकावर शिक्षण देण्या शिवाय अनेक जबाबदाऱ्या लादल्या जात आहेत, दबावाला बळी पडून शिकविणे सोडून इतर कार्यासाठी वेळ द्यावा लागतो.

कारण त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न असतो. उद्या पगार बंद झालातर ? हा प्रश्न त्याना भेडसावत असतो. त्यामुळे तेही बेताचेच शिकवित असतात आणि संस्कारीत पीढी निर्माण करीत असतात. केवळ पुस्तकी ज्ञान त्यांच्या पदरी टाकून मोकळे होत असतात. त्यामुळे ज्येष्ठांना वाटते कीं संस्कृती, आणि शिस्त ही चाके आता राहिले नाहीत आणि त्यामुळे घूसूर वातावरण होत आहे. शिवाय मुलानी वाचन करीत रहावे ही ज्येष्ठांची संकल्पना मुलांना मनातून आवडत नाही. त्यामुळे ज्येष्ठ विनाकारण नैराश्याच अवलंबन करतात.

वर्तमानात नातवांची पिढी वैज्ञानिक उपकरणाच्या वापराच्या माध्यमातून खूप पुढे झेपावत आहे. ज्येष्ठांच्या मनात त्याबद्दल कुतूहल निर्माण होते पण मनातून ज्येष्ठांना वाटते की पुढचे पाठ मागचे सपाट अशीच वृत्ती मुलांमध्ये निर्माण होत आहे. त्यामुळे ज्येष्ठांच्या मानसिक स्थिती बिघडत जावून अनेक मार्गानी त्यांचे आरोग्य धोक्यात परावर्तीत होतआहे. म्हणूनच आयुष्याच्या संध्या समयी ज्येष्ठ मनाने, भावनानी , प्रेम आपुलकी सहकार्य न मिळाल्याने वैचारिक दुर्बलते बरोबरच शाररिक दुर्बलता प्राप्त होते. असहाय्यते मुळे त्यांचे अनुभवी विचार, शिस्त, जीद्द, कल्पकता, अभिव्यक्ती त्वाचे दर्शन हे प्रभावी माध्यमही संध्या समयाची वाट धरीत आहे. मग सांगा ज्येष्ठ नैराश्य भावने पासून, दूर कसे राहू शकतात? पण स्वानंदासाठी ह्या नैराश्यासून बाहेर येण्याची रास्त गरज आहे. कुटुंबीयांशी मनमोकळा संवाद साधण्याची नितांत गरज आहे. **(क्रमशः)**




## जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
नको असा छळू
उभ हिरवं शिवार
बघ लागलया जळू ||८२६||

अरे बरस पावसा
मान टाकली रोपांन
डोळ्यांदेखत सुकल
माझ हिरवं सपान ||८२७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७०





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

**सदा रामनामे वदा पूर्णकामे ।**
**कदा बाधिजेनापदा नित्यनेमे ।**
**मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७०।।**

अर्थ : अगदी मनापासून रामनाम घ्यावे. नित्यनेमाने नाम घेणाऱ्यास संकटांचा त्रास होत नाही. अहंकार आणि आळस या दुर्गुणांचा त्याग करावा. आणि प्रभात समयी श्रीरामाचे चिंतन करावे.

( वदा - म्हणा, पूर्णकामे - अगदी मनापासून, बाधणे - त्रास होणे, आपदा - संकट, मद - अहंकार, आलस्य - आळस )



विवेचन : या श्लोकात भगवंताचे नाम अगदी मनापासून घ्यावे असे समर्थ आपल्याला सांगत आहेत. त्यासाठी त्यांनी पूर्णकामे हा सुंदर शब्द वापरला आहे. व्यवहारात कोणतीही गोष्ट आपण केली तर आपल्याला तिचे काय फळ मिळेल याकडे आपले लक्ष असते. फळाची अपेक्षा ठेवूनच आपण कर्म करीत असतो. पण जेव्हा रामनाम किंवा भगवंताचे नाम आपण घेतो तेव्हा त्यापासून आपल्याला काय फळ मिळेल अशी अपेक्षा ठेवू नये. नाम फक्त नामासाठीच किंवा भगवंतासाठीच घ्यावे. असे नाम जेव्हा आपण घेऊ त्यावेळी इतर सर्व अपेक्षा आपोआपच नाहीशा होतील. ते नाम मग मनापासून घेतले जाईल म्हणजेच समर्थ सांगतात तसे पूर्णकामे.

तसेच समर्थ म्हणतात की नित्यनेमाने नाम घेणाऱ्याला संकटे त्रास देत नाहीत. नित्यनेमामुळे संकटे येत नाहीत असे नाही, तर संकटातही मनाचा समतोल राखण्याची आणि त्या आपदा सोसण्याची शक्ती रामनामामुळे मिळते असा याचा अर्थ आहे. संकटांची धाव देहापर्यंतच असते परंतु अखंड नामस्मरण करणाऱ्याला त्यांचा त्रास होत नाही.

परंतु असे अगदी मनापासून नाम घेण्याच्या आड दोन मोठया अडचणी उभ्या राहतात. एक म्हणजे आपला अहंकार. मी कशाला नाम घेऊ ? मला त्याची काय आवश्यकता ? नाम घेणे हे रिकामटेकड्या लोकांचे काम आहे. त्याशिवाय नुसते नाम घेऊन काय होणार ? त्याच्या जोडीला ज्ञान नको का ? असे नानाविध विचार मनात येऊन माणूस नाम घेण्याच्या विचारापासून परावृत्त होतो. पण इथे आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की सगळ्याच संतांनी नामस्मरणाचा महिमा वर्णन केला आहे. भगवंत प्राप्तीसाठी नामसारखे सोपे साधन नाही असे ते म्हणतात. गोंदवलेकर महाराजांनी तर आपल्या प्रत्येक प्रवचनात निरनिराळ्या प्रकारे केवळ नाम घेण्याचा उपदेश केला आहे.

**(क्रमशः)**




## || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ वाचन

वाचन माणसाला रद्दी होण्यापासून वाचविते, वाचनाने माणूस समृद्ध होतो, वाचन हा बौद्धिक विषय आहे, वाचनाने मेंदू तल्लख बनतो त्यामुळे माणसाची बौद्धिक क्षमता वाढते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# नाम हे सत्स्वरूप आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम हे रूपापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे; त्यामुळे रूपाचे ध्यान मनामध्ये आले नाही तरी नाम सोडू नये. पुढे रूप आपोआप येऊ लागेल. रूप हे जड आणि दृश्य असल्यामुळे उत्पत्ती, स्थिती आणि विनाश, वाढ होणे आणि घटणे, जागा व्यापणे आणि जागा बदलणे, कालमानाने फरक पडणे इत्यादि बंधने त्याला असतात; पण नाम हे दृश्याच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट, देशकालनिमित्ताच्या मर्यादा, इत्यादि कोणतेही विकार नाहीत. नाम हे सत्स्वरूप आहे. नाम हे रूपापेक्षा व्यापक असते. व्यापक वस्तूचे क्षेत्र मोठे असल्याने तिच्यामध्ये शक्तीदेखील अधिक असते. जिच्यामध्ये शक्ती जास्त असते ती वस्तू अधिक स्वतंत्र असते. जी वस्तू अधिक स्वतंत्र असते तिला बंधने किंवा मर्यादा कमी असतात. म्हणून नाम हे रूपापेक्षा अधिक व्यापक, अधिक शक्तिमान, अधिक स्वतंत्र आणि अधिक बंधनरहित असते.

आपली ज्ञानक्रिया कशी चालते ते पाहू. आपण एका टेकडीवर उभे राहून सृष्टिसौंदर्य पाहिले. त्या पाहण्यात कोणकोणत्या क्रिया होतात पाहा. प्रथम डोळ्यांमधून प्रकाश-किरणे आत गेली. बाह्य पदार्थांचे मनुष्याला ज्ञान व्हायला इंद्रिये हे पहिले साधन आहे. इंद्रियांमधून आत आलेले संस्कार एकत्र करून मन त्यांना वस्तूस्वरूप देते. वस्तूस्वरूप तयार झाल्यावर, बुद्धी सारासार विचार करून त्या वस्तूचे यथार्थ ज्ञान आपल्याला करून देते. पण मनुष्याच्या बुद्धीचा व्यापार इथेच थांबत नाही. टेकडीवरून आजूबाजूला पाहात असताना झाडे, वेली, घरे, बागा, माणसे, पक्षी, पाण्याचे तलाव इ. सर्व वस्तूंचे ज्ञान झाल्यावर पुन्हा त्यांचे एकीकरण होऊन, 'ही सृष्टीची शोभा आहे' असे ज्ञान आपल्याला होते. म्हणजे अनेकांत एकत्व शोधणे हेच मानवी ज्ञानाचे लक्षण आहे. या जगामध्ये कितीतरी वैचित्र्य आढळते. नाना तऱ्हेचे दगड, नाना तऱ्हेचे किडे, नाना प्रकारचे पक्षी, प्राणी या सर्वांची नावे जरी भिन्न असली तरी त्या सर्वांमध्ये 'असणेपणाचा' गुण आहे; म्हणजे, सजीव प्राणी झाला तरी तो 'आहे', आणि निर्जीव वस्तू झाली तरी तीही 'आहे'. एवढेच काय, पण आनंदालासुद्धा 'आहेपणा'चा गुण आहे. या 'असणेपणा'च्या गुणाला 'नाम' असे म्हणतात. यालाच 'ॐकार' असे म्हणतात. 'ॐकारांतून सर्व सृष्टी उगम पावली. ॐकार हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. अर्थात, नाम म्हणजे सत् होय. म्हणूनच नाम हे सृष्टीच्या आरंभी होते, ते सध्या आहेच, आणि सृष्टीचा लय झाला तरी ते शिल्लक राहणारच. नाम म्हणजे ईश्वर होय. नामातून अनंत रूपे उत्पन्न होतात आणि अखेर त्यामध्येच ती लीन होतात. रूप हे नामाहून निराळे राहू शकत नाही. नाम हे रूपाला व्यापून पुन्हा शिल्लक उरते.

नाम हे शाश्वत आहे. ते पूर्वी टिकले, आता आहे, आणि आपण गेल्यावर ते राहणार आहे.

**

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### ♦ श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



♦ नीरा नदीवरील तीर्थे

१) लक्ष्मी तीर्थ

हिरण्यकशीपूचा वध करून भगवान श्री नृसिंह यांचा उग्र कोप शांत होत नव्हता. देव, ऋषी व लक्ष्मी देवीने त्यांची स्तुती केली. श्री लक्ष्मीदेवी यांनी या संगमावर तपश्चर्या करून भगवंताला प्रसन्न केले. त्यांच्या तपामुळे भगवान शांत झाले. या स्थानी स्नान केल्यास लक्ष्मी प्राप्ती, सौभाग्य व पाप क्षय होईल असा वर भगवंतांनी दिला. या स्थानाला लक्ष्मी तीर्थ म्हणतात. हे मुख्य मंदिराच्या पश्चिम दरवाजा जवळ घाटावर आहे.

२) पद्म तीर्थ

श्री लक्ष्मी ने भगवंताच्या पूजेसाठी सहस्त्र कमळानी अर्चण केले त्या कमळा मुळे हे स्थान पवित्र झाले. म्हणून त्याला पद्म तीर्थ म्हणतात. या तीर्थात स्नान, विष्णु पूजा केल्याने, विष्णू लोकांची प्राप्ती होते. हे तीर्थ लक्ष्मी तीर्थाच्या वरच्या बाजूस आहे.

३) शंख तीर्थ

भगवान विष्णूच्या पांचजन्य शंखाने येथे अभिषेक केला. अशी आख्यायिका आहे. या तीर्थात स्नान केल्याने जन्म जन्मातरीची पापे नष्ट होतात, आणि मन शुद्ध होते, असे क्षेत्र महात्म्यात वर्णन आहे. नीरा नदीवर हे तीर्थ आहे.

(क्रमश:)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### तरूणवर्ग किंवा विद्यार्थी आक्रमक का होतोय?

मित्रांनो आज आपण सर्वत्र पाहतो की,आजचा तरुण किंवा महाविद्यालयीन वा घराघरातील मुले आक्रमक किंवा अतिरेकी का झाली आहेत?? आज बर्याच घटनेवरून काही निष्कर्ष काढणे योग्य नाही. मग नेमके काय कारणे त्याची चर्चा होणे आवश्यक आहे. कोण चुकीचे आहे, आई, वडील शिक्षक का समाज का आजची परिस्थिती? खरेतर या प्रश्नाला अनेक पदर आहेत किंवा कारणे आहेत असे मला वाटते, तुमचे मत मला सेंट करा.एक तर शैक्षणिक स्पर्धा, करियरचा तणाव अनिश्चितता, पालकांचीही अपेक्षा व भिती यामुळे निराशा चिडचिड होते.हेच ऊध्याचे नागरिक समाजसेवक व राष्ट्रीय भविष्य आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की कुटुंबाची बदलती शैली, डिजिटल माध्यमे, आभासी जग, याचा परिणाम आणि पुर्वीची धाक, सदाचार संस्कार, संवाद कमी होत गेला, याचा परिणाम होतो काय? तसेच मित्रपरिवार, चुकीची संगत आणि पालकांची अतीलाड तसेच समाजात वाढती असहिष्णुता, प्रत्येकाची असंयमी भाषा, शिष्टाचार, व कायद्याबद्दल कमी आदर व व्यसनाधिनता याचा परिणाम या वर्गावर होत आहे काय .असो आज एवढी चर्चा पुरे. तुम्ही वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. सुप्रभात.

## || श्री दत्त महिमा ||



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



### कैलास राणा शिव चंद्रमौळी फणींद्र माथा मुगुटे झळाळी
### कारुण्य सिंधू भव दुःख हारी तुजविण शंभो मज कोण तारी

ज्योतिर्मय साहित्य

श्रावण मास आणि शिवशंकराचे स्तवन कारण या

वरद दत्त संस्थान मधील शिवशंकर यांचे स्थान महात्म आपणास आज पहायचे आहे.

आपण दत्त जन्म प्रसंगी घडलेली घटना मागील लेखामध्ये पाहिली त्याप्रमाणे ब्रम्हा विष्णू आणि महेश तीनही देव अनुसया मातेच्या आश्रमात भिक्षेकऱ्याच्या स्वरूपात आले होते त्यांच्यावर पती चरणाचे तीर्थ प्रोक्षण करून अनुसया मातेने तीनही देवांना बालस्वरूपात केले होते ही कथा सर्व ज्ञात आहे ज्यावेळी ब्रह्मा विष्णू महेश भिक्षेकरेच्या वेशात आले होते त्यांना अनुसया मातेस आपले मूळ स्वरूप दर्शवायचे नव्हते म्हणून ते तिघेही आपली आयुधे व आपली वाहन सोबत घेतलेली नव्हती जसे गरुडा शिवाय श्रीविष्णू नंदी शिवाय महेश व कमलपुष्पा शिवाय ब्रह्मदेव आले होते.

त्याचेच प्रतीक म्हणून या स्थानी सोमेश्वर नामे शिव शंकराचे स्थान आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे नंदी शिवाय



शिवलिंगाचे दर्शन होते.

भारतातील सर्व शिव मंदिरात शंकराचे वाहन म्हणून नंदी देवतेची मूर्ती पहावयास मिळते अतिशय कमी स्थाने नंदी शिवाय शिव दृष्टीपथात येतात. कारण नंदी गणाशिवाय शिव कोठेही दिसत नाहीत तरीपण असे हे दुर्मिळ ठिकाण आपणास पहावयास मिळते

दत्त जन्म स्थान व तेथे शिव शंकराची आराधना असे हे अनोखे दुर्मिळ स्थान आपण प्रत्यक्ष अवलोकन करावे व दर्शनाचा लाभ घ्यावा या स्थानी आरोग्य विषयक अनेक व्याधी चे निराकरण होते अशी भाविकांची श्रद्धा आहे सायंकाळी या सोमेश्वर देवतेची प्रदोष पूजा व दर्शन

विशेष लाभकारक आहे यासाठी हा लेखन प्रपंच म्हणून शिवस्तुतीमध्ये म्हटल्याप्रमाणे

प्रात:काले शिवम दृष्ट्वा निशिपापम विनश्चती

आजन्म कृत्यमाध्याने सायांने सप्त जन्मनः

अर्थात प्रातःकाळी शिवदर्शन केले तर एक दिवसाचे पापहरण होते .


माध्यम काळी दर्शन केले असता एका जन्माचे पाप नाश न होते व सायंकाळी दर्शनी केल्याने सात जन्माचे पाप हरण होते गुरुदेव दत्त कृपा करा

योगीराज राक्षस भुवनकर आद्यपीठ श्री वरद दत्त संस्थान राक्षस भुवन

## || अभंग-माधव ||



माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



------- जन्माष्टमी ---------

जेव्हा जेव्हा जगी । धर्मा येता ग्लानी ।
विष्णू ह्या भुवनी । अवतरे ॥१॥
विष्णूचा आठवा । कृष्ण अवतार ।
झाला पृथ्वीवर । मथुरेत ॥२॥
श्रावण मासात । वद्य ह्या पक्षात ।
अष्टमी रात्रीस । कृष्ण जन्मे ॥३॥
देवकी जननी । वसुदेव तात ।
कंसाच्या कैदेत । होते दोघे ॥४॥
बालक जन्मता । तात बालकाला ।
घेऊन तो गेला । गोकुळात ॥५॥
कृष्ण जन्मोत्सव । व्हावया लागला ।
वद्य अष्टमीला । श्रावणात ॥६॥
ह्याच दिवसाला । गोकुळ अष्टमी ।
तथा जन्माष्टमी । नाव लाभे ॥७॥
माधव हा म्हणे । दिन जन्माष्टमी ।
साजरा नेहमी । करु सारे ॥८॥

# कामगारहितासाठी भारतीय मजदूर संघाचा ठाम आवाज - केंद्रीय कामगार मंत्र्यांकडून सुधारणा करण्याचे आश्वासन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - नवीन कामगार संहितांमधील कामगारविरोधी तरतुदी, सामाजिक सुरक्षा आणि रोजगार संरक्षणासंदर्भात भारतीय मजदूर संघाच्या केंद्रीय नेतृत्वाने केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री डॉ.मनसुख मांडविया यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. भारतीय मजदूर संघाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करून आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील,असे आश्वासन केंद्रीय मंत्र्यांनी दिले.

दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी भारतीय मजदूर संघाच्या वतीने देशव्यापी आंदोलन करण्यात आले होते.या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत भारतीय मजदूर संघाच्या केंद्रीय शिष्टमंडळाने नवीन कामगार संहितांमधील विविध तरतुदींबाबत




आपल्या हरकती व मागण्या मंत्र्यांसमोर मांडल्या.

शिष्टमंडळात अखिल भारतीय अध्यक्ष एस. मल्लेशम, अखिल भारतीय महामंत्री सुरेंद्र कुमार पांडेय, अखिल भारतीय संघटन मंत्री बी. सुरेंद्रन, माजी अखिल भारतीय अध्यक्ष हिरण्य पांड्या आणि संजी नारायण यांचा समावेश होता.

बैठकीत सामाजिक सुरक्षा कवचाचा विस्तार करण्यासाठी इपीएफ ची वेतन मर्यादा ₹१५ हजारांवरून ₹३० हजार, तसेच बोनस व इएसआय ची वेतन मर्यादा ₹२१ हजारांवरून ₹४२ हजार करण्याची मागणी करण्यात आली.

कामगारांना मनमानी पद्धतीने कमी करण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी स्थायी आदेश, कामगार कपात आणि कामबंदीच्या तरतुदी लागू होण्याची कामगारसंख्या मर्यादा ३०० वरून १०० करण्याची मागणी करण्यात आली. कायमस्वरूपी स्वरूपाच्या कामांसाठी कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा तसेच मुदतबद्ध रोजगार पद्धतीचा वापर मर्यादित ठेवावा,अशीही मागणी भारतीय मजदूर संघाने केली.

याशिवाय,कामगार संघटनांच्या मान्यतेसाठी असलेल्या ५१ टक्के सदस्यत्वाच्या अटीचा पुनर्विचार, कौन्सिल च्या तरतुदींमध्ये सुधारणा,निर्धारित कालावधीत नोंदणी न झाल्यास डीमड रेजिस्ट्रेशन ची तरतूद तसेच 'कामगार' या व्याख्येतील वेतन मर्यादेत सुधारणा आणि संपाच्या अधिकारासंदर्भातील नोटीस अटींमध्ये शिथिलता देण्याची मागणी करण्यात आली.

डॉ. मनसुख मांडविया यांनी शिष्टमंडळाचे निवेदन गांभीर्याने ऐकून घेतले असून, सर्व मुद्द्यांची तपासणी करून आवश्यक सुधारणा व कायद्यातील दुरुस्त्यांचा लवकर विचार करण्यात येईल,असे आश्वासन दिले.

पुढील टप्प्यात व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थिती संहितेतील तरतुदींवर भारतीय मजदूर संघाच्या केंद्रीय नेतृत्वासोबत स्वतंत्र उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली.

देशातील कोट्यवधी कामगारांचे हक्क, सामाजिक सुरक्षा आणि सन्मानजनक रोजगारासाठी भारतीय मजदूर संघाचा रचनात्मक व निर्णायक संघर्ष सातत्याने सुरू राहील, असे अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी सांगितले.




## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील`` ``लोकजागर``कार्यक्रमात धोंडीरामसिंह राजपूत

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर - मराठवाड्याचे बालसाहित्यक, लेखक, कवी व समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांची आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर ``लोकजागर`` कार्यक्रमात नुकतीच त्यांच्या वर्ष १९६७ पासूनच्या सामाजिक, शैक्षणिक, साहित्यक व राष्ट्रीय कार्याची आढावा घेणारी मुलाखत प्रसारित झाली. आकाशवाणी निर्देशक एस. बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदिका अनुप्रिया भाले यांनी राजपूत यांची मुलाखत घेतली. राजपूत यांनी आपल्या ७६ वर्षाच्या कारकिर्दीतील १९६७ पासूनच्या सामाजिक कार्याचा लेखा - जोखा या कार्यक्रमात सादर केला,श्रीमती भाले यांनी त्यांना विविध प्रकारच्या सामाजिक कार्यावर प्रश्न विचारून राजपूत यांच्या सामाजिक कार्याचा परिचय श्रोत्यांना करून दिला. राजपूत यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्धल महाराष्ट्र शासनाने त्यांना एकाच समयी अत्यंत मानाचे असलेले दोन पुरस्कार अनुक्रमे डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार व कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे. राजपूत यांनी तळागाळातील दीन, दुबळे, गोर, गरीब, आदिवासी याच्यासाठी सामाजिक बांधिलकी जपत अशा घटकाना शासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने शासकीय जमिनी मिळवून देणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळवून देणे,त्यांना शिष्यवृत्ती मिळवून देणे,बचत गट स्थापन करून महिलांना स्वावलंबी बनविणे, एकल महिलांना शासनाच्या नियोजित योजनेसाठी माहिती देणे, शेतकरी कुटुंबांना शासकीय मदत मिळवून देणे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, पाणी अडवा, पाणी जिरवा, साहित्य लेखन व वृत्तपत्रीय लेखन माध्यमातून समाजजागृती करणे, सेवा निवृत्त फौजी जवान यांच्या पाठिशी खंबीर पणे उभे राहून त्यांना आरोग्य सेवा मिळवून देणे तसेच, कौटुंबिक आधार देणे, देहदान व अवयव दान विषयी जनजागृती करणे, जेष्ठ नागरिकांच्या व्यथा दुर करणे, त्यांना सहकार्य ईत्यादी समाज कार्य करणे हे त्यांचे कार्य विचारात घेऊन आकाशवाणी संभाजीनगर यांनी त्यांना पाचारण करुन त्यांचे समाज कार्य समाजापर्यंत पोहचविले.

# इको फ्रेंडली श्रीगणेश मुर्ती कार्यशाळा

**ज्योतिर्मय साहित्य**

महाळुंगे, पुणे : आज दि. २/९/२०२६ रोजी श्री. नामदेवराव मोहळ माध्यमिक विद्यालयात इको फ्रेंडली शाडू माती पासून पर्यावरण पुरक श्रीगणेश मुर्ती तयार करण्याची कार्यशाळा मुर्ती शिल्पकार अभियंता श्री.व्यंकट प्रसाद आय्यार यांनी प्रात्यक्षिक दाखवले.

त्यात एकूण ८० शालेय मुला-मुलींनी सहभाग घेतला होता. मुख्याध्यापक श्री सईद सर व शाळेच्या सह शिक्षिका सौ.पाडाळे, सौ.धुमाळ, सौ.भांबरे बहुमोल सहकार्या खाली संपन्न झाली होती.

सदर कार्यशाळा श्रीभगवती सेवा आश्रम चे गिरीधर राठी, डॉ.श्याम कुलकर्णी,विकास जोशी यांनी नियोजन केले होते.



# तालुकास्तरीय फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेमध्ये एस के पोरवाल ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे चयन

**ज्योतिर्मय साहित्य**

कामठी: क्रीडा व युवक संचनालय पुणे अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धा दिनांक १/९/२२६ ला नागपूर कुस्तीसंघ द्वारा आयोजित या स्पर्धेमध्ये

एकूण १८ विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आपले प्रदर्शन दाखविले. यामध्ये पोरवाल कॉलेजचा वयोगट १९ मध्ये हनी अली शहीद हैदरी वजन गट ५७ तसेच शौर्य नीरज यादव वजन गट ५७ तसेच वजन गट १७ मध्ये कपिल शेंडे वजन गट ५१ किलो या तिघांनी आपल्या वजन गटामध्ये आपले कौशल्य दाखवून जिल्हास्तरीय स्पर्धा करिता पात्र ठरले कॉलेजच्या प्राध्यापिका डॉ. मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन लाभले. निंबाजी




आखाड्याचे अध्यक्ष तसेच यादव यांनी कामठी तालुक्यातील स्पर्धकांकरिता दहा दिवसांचे शिबिर आयोजित केलेले आहे व त्यांना तिथे सकस आहार सुद्धा देण्यात येणार आहे.

या दरम्यान सर्व विजेता स्पर्धकांना कुस्तीचे विविध डावपेच व कौशल्य शिकल्या जाणार आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धा करिता कॉलेजचे प्राचार्य डॉ स्वप्नील दहात सर तसेच उपप्राचार्य वंजारी सर तसेच पर्यवेक्षक मेंढे सर तसेच कॉलेजचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पुढील स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## अभावातून प्रभावाकडे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495



### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

पुढे....

सुख-दुःखाच्या अनुभवांनी ज्याचे अंतःकरण सतत हेलकावे खात नाही, जो धीर आहे, तो अमृतत्वाचा अधिकारी होतो.

याचा सूक्ष्म अर्थ असा—घटना बदलण्यापूर्वी तिच्यामुळे मनात निर्माण होणारी प्रतिक्रिया पाहायला शिकणे.

भूतकाळातील दुःख पुन्हा पुन्हा जगणे आणि भविष्याची भीती आत्ताच अनुभवणे—दोन्ही वर्तमानातील चित्तशक्ती खर्च करतात.

३. "विचार मी नाही" — योगसूत्राचा आधार

पतंजलींचे अत्यंत प्रसिद्ध सूत्र—

योगश्चित्तवृत्तिनिरोधः ॥ (योगसूत्र १.२)

आणि त्यानंतर—

तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ॥ (योगसूत्र १.३)

याचा गूढार्थ अत्यंत सुंदर आहे.

चित्ताच्या सतत उठणाऱ्या वृत्तींपासून मनाची ओळख थोडी बाजूला झाली की द्रष्टा आपल्या स्वरूपात स्थित होतो.

म्हणजे—विचार उठतो → आपण तो पाहतो → "मी विचार आहे" ही ओळख सैल होते → साक्षीची जाणीव स्पष्ट होते.

"ज्या क्षणी आपण एखाद्या भावनेकडे पाहतो, त्या क्षणी आपण केवळ ती भावना राहत नाही."या वाक्याला हा योगसूत्राधार अत्यंत सुंदरपणे लागू होतो.

४. स्मृती आणि कल्पना चित्ताला वर्तमानापासून दूर नेतात

पतंजली चित्तवृत्तींचे स्वरूप सांगताना म्हणतात—

विपर्ययो मिथ्याज्ञानमतद्रूपप्रतिष्ठम् ।
शब्दज्ञानानुपाती वस्तुशून्यो विकल्पः ॥
अनुभूतविषयासंप्रमोषः स्मृतिः ॥
— योगसूत्र १.८–१.११

यामध्ये विकल्प म्हणजे कल्पनात्मक विचार आणि स्मृती म्हणजे अनुभवलेल्या विषयाची मानसिक पुनरावृत्ती.

म्हणून तुमच्या लेखातील दोन प्रवाह अगदी स्पष्ट होतात—

अतीत → स्मृती
भविष्य → कल्पना / विकल्प

आणि मन या दोन्हीमध्ये सतत फिरत राहू शकते.

५. मन वर्तमानात का राहत नाही?

(क्रमश:)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### रोज १% सुधारणा-वर्षभरात मोठा बदल

आपल्याला सगळ्यांनाच आयुष्यात मोठं काहीतरी करायचं असतं.
कोणाला आरोग्य सुधारायचं असतं...
कोणाला भरपूर वाचायचं असतं...
कोणाला राग कमी करायचा असतो...
कोणाला आर्थिक परिस्थिती बदलायची असते...
कोणाला स्वतःची ओळख निर्माण करायची असते.
पण सुरुवात करताना आपण अनेकदा स्वतःवरच खूप मोठं ओझं टाकतो.
"उद्यापासून रोज दोन तास व्यायाम करणार!"
"दररोज पन्नास पानं वाचणार!"
"आता कधीच रागावणार नाही!"
"आता पूर्ण आयुष्य बदलणार!"
दोन-चार दिवस उत्साह असतो...
मग एखादा दिवस चुकतो.
आणि आपण स्वतःलाच म्हणतो—
"माझ्याकडून हे होणारच नाही."
पण खरं तर बदलासाठी मोठी उडी आवश्यक नसते.
छोटी पावलं पुरेशी असतात.
रोज फक्त १% सुधारणा.
आज कालपेक्षा थोडं चांगलं.
उद्या आजपेक्षा थोडं चांगलं.
एवढंच.
"तुला आज पहिला यायचं नाही. फक्त कालपेक्षा आज एक पान जास्त समजून घ्यायचं आहे."
आपल्या आयुष्यातील मोठे बदलही असेच असतात.
एका दिवसाची मोठी मेहनत नाही...
तर रोजची छोटी निष्ठा.
दररोज दहा मिनिटं वाचणं.
दररोज थोडं चालणं.
दररोज थोडी बचत.
दररोज एक चांगला विचार.
दररोज एक चुकीची सवय कमी करणं.
दररोज एखाद्या माणसाशी प्रेमाने बोलणं.
दररोज स्वतःला थोडं समजून घेणं.
हे सगळं करताना पहिल्या काही दिवसांत काहीच बदल दिसणार नाही.
पण मातीखाली रुजणाऱ्या बीजासारखा... (क्रमश:)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बहीण-भाऊ' (अतूट विश्वासाचा रेशीमबंध)

'नात्यांचं महावस्त्र' विणताना आपण आतापर्यंत आईची 'मायेची पैठणी', बाबांची 'सह्याद्रीची ढाल', आजीची 'संस्कारांची शिदोरी', आजोबांचे 'सुरकुत्यांमधील शहाणपण', मामाचा 'माहेरचा समृद्ध दुवा', मावशीची 'आईची प्रतिछाया', आत्याचा 'बाबांच्या बालपणाची जपणूक करणारा कोपरा' आणि काकांचा 'कुटुंबाचा आधारस्तंभ' हा समृद्ध प्रवास अनुभवला. या महावस्त्रातील सर्वात खोडकर, निष्पाप, पण तितकाच जिवाभावाचा आणि अथांग विश्वासाचा रेशमी धागा म्हणजे 'बहीण-भाऊ'! हा असा रेशमी धागा आहे, ज्याच्या उल्लेखाशिवाय हे महावस्त्र पूर्णच होऊ शकत नाही.

हे नातं जगातील सर्व नात्यांपेक्षा वेगळं आणि विलक्षण असतं. यात रक्ताचा घट्ट बंध असतोच, पण माया देखील तेवढीच अथांग असते. एकाच घरात, एकाच छताखाली वाढलेली ही धाकली पाती असतात. महावस्त्राच्या धाग्यांमधील हे अतूट असे रेशीमबंध! घरामधील एकच माती, मातीमधली प्रेमळ नाती, भावाबहिणीची आगळीक जाती, करी लाभावीण प्रीती! (क्रमश:)

# दीपलक्ष्मी पतसंस्था म्हणजे ज्ञान व धनाचा संगम असणारी पतसंस्था - डॉ. यशवंत पाटणे

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा – दीप हे ज्ञानाचे प्रतीक तर लक्ष्मी ही धनाचे प्रतीक आहे म्हणूनच दीपलक्ष्मी पतसंस्था म्हणजे ज्ञान व धनाचा संगम असणारी पतसंस्था आहे असे गौरउद्गार ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे यांनी दीपलक्ष्मी पतसंस्था शाखा शाहूपुरी २४ व्या वर्धापन दिना दिवशी आयोजित केलेल्या विशेष स्नेहसंमेलन प्रसंगी काढले.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत कात्रे, प्राचार्य वि ना लांडगे,संस्थेचे संस्थापक- चेअरमन शिरीष चिटणीस, व्हॉ. चेअरमन आप्पासो शालगर, संचालक अनिल चिटणीस, भगवान नारकर, व्यवस्थापक विनायक भोसले, सह. व्यवस्थापक व शाखाधिकारी रवींद्र कळसकर, जनार्दन निपाणे मान्यवर उपस्थित होते.

यापुढे डॉ. यशवंत पाटणे म्हणाले दीपलक्ष्मी पतसंस्था ही साहित्य, शिक्षण, अर्थ, व्यापार या सर्व क्षेत्रांशी संबंध असणारी सामाजिक संस्था असून ज्ञान व धन जेथे गुण्यागोविंदाने नांदतात अशी ही संस्था होय. यावेळी शिरीष चिटणीस यांच्या बद्दल आपणाला आदर असून आज सहकार क्षेत्र ज्या चळवळीतून जात आहे ते सर्वजण आपण पाहत आहोत त्यामध्ये शिक्षण व सहकार या दोन्ही गोष्टी माणसाच्या जीवनाशी निगडित असतात व या दोन्ही गोष्टी ते लीलया पार पडतात. सातारा शहरात जास्तीत जास्त सांस्कृतिक कार्यक्रम घेणारी ही पतसंस्था असून या संस्थेमार्फत आर्थिक सेवेबरोबर सामाजिक बांधिलकी ही जपली जाते. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे संस्था नेहमीच आयोजन करून समाजाला आर्थिक तसेच सर्व क्षेत्रात समृद्ध करून मानवतेची सेवा करणारी ही एक संस्था आहे. जर तुमच्यापाशी ज्ञान असेल तर तुम्ही धन अर्जित करू शकता परंतु तुमच्याकडे नुसते धन असेल तर तुम्ही ज्ञान अर्जित करू शकत नाही. बुद्धी हे ज्ञानाचे प्रतीक असून ज्ञान हे प्रथमतः लक्ष्मी ही त्यानंतर येते.

श्रीकांत कात्रे म्हणाले पतसंस्था किंवा आर्थिक संस्था पैशाचे सर्व व्यवहार करतात परंतु माणूसपणाचा व्यवहार करणारी संस्था म्हणजे दीपलक्ष्मी पतसंस्था होय. माणसाला उभे करण्याचे काम संस्था करत असून त्या व्यक्तीचे सामाजिक, सांस्कृतिक जडणघडण टिकून ते पुढे आणण्यासाठी कार्य करणारी संस्था म्हणून दीपलक्ष्मी पतसंस्थेकडे पाहिले जाते. माणूस कसा घडवला पाहिजे त्यासाठी वेगवेगळे उपक्रम ही संस्था सातत्याने राबवत असून सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात अग्रेसर असणारी ही पतसंस्था आहे. माणसाचे जीवन समृद्ध व्हावे यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक असतात त्या त्या सर्व गोष्टी करण्यासाठी ही संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. त्यामुळे अल्पावधीतच संस्थेने लोकांचा विश्वास कमावला आहे.

शिरीष चिटणीस म्हणाले सातारच्या सर्व क्षेत्रामध्ये योगदान देणारी ही संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून अनेक समाजपयोगी कामे अविरत घड़त आहेत. संस्थेच्या आजमितीस शनिवार पेठ व शाहूपुरी येथे दोन मुख्य वास्तू असून या वास्तू मधून सातारची संस्कृती समृद्ध करण्याचे कार्य ही संस्था करत असते. यामध्ये कराओके ची गीत मैफिल, चर्चासत्रे, विविध साहित्यिकांची भाषणे, पुस्तक प्रदर्शन, पुस्तक प्रकाशन, चित्रप्रदर्शन असे विविध कार्यक्रम घेऊन संपन्न समाज निर्मितीमध्ये खारीचा वाटा उचलन्याचा प्रयत्न केला जातो.

सातारा शहरांमध्ये सध्या मोठ्या आर्थिक संस्था येऊन व्यवसाय करत आहेत. सातारच्या शहराच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या स्थानिक पतसंस्थेत ठेवी ठेवून व कर्ज घेऊन पाठिंबा दिला पाहिजे तसेच संस्थेचे आर्थिक व्यवहार पाहून त्यांच्यावर अंकुशही ठेवला पाहिजे असा सल्ला दिला. दीपलक्ष्मी पतसंस्था सातारा शहरात नव्हे तर पुण्यामध्ये सुद्धा विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन सातारा शहराचा सांस्कृतिक वारसा पुण्यामध्ये सुद्धा जोपासण्याचा प्रयत्न करत आहे.

यावेळी डॉ.यशवंत पाटणे यांनी आपल्या समृद्ध विचाराने समाजाला



प्रेरणा दिली असून त्यांचे कार्य अखंडित चालू आहे तसेच श्रीकांत कात्रे हे एक निस्पृह पत्रकार असून सातारच्या सर्व बातम्या देण्याचे कार्य ते प्रामाणिकपणे पार पाडतात. वि .ना. लांडगे यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य ही आदर्श आहे.

वि. ना. लांडगे म्हणाले दीपलक्ष्मी पतसंस्था ही माणसे जोडण्याचे काम करीत असून संस्थेच्या माध्यमातून सामान्य माणसाची पत सुधारण्याचे काम करत आहे. सगळ्याच गोष्टी ह्या पैशाने विकत घेता येत नाहीत. माणुसकीने माणसे जोडायची असतात. दीपलक्ष्मी पतसंस्था ही सहकारात काम करत असताना सामाजिक बांधिलकीपोटी विविध कार्यक्रम घेऊन समाजाला आर्थिक तसेच सर्व क्षेत्रात समृद्ध करणारी पतसंस्था आहे.

ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून माणुसकीचा व्यवहार करणारी जोपासणारी संस्था आहे असे म्हणाले. सदर प्रसंगी संस्थेचे ठेवीदार प्रदीप चोरगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले,, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र कळसकर यांनी केले असून प्रास्ताविक शिरीष चिटणीस व विनायक भोसले यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास श्री व सौ सुशांत कदम, संतोष घाडगे, अविनाश सकुंडे, कमलाकर दीक्षित, विष्णुपंत सूर्यवंशी, बगाराम पवार, दांडेकर, आबाजी शिंदे, रतन पाटोळे, राहुल वेल्हाळ, अनिल करंबळे, रामचंद्र हनुमंते, अभिनंदन मोरे, अग्रेश शिंदे, लक्ष्मण कदम, रविराज जाधव, अनिल मसुरकर, प्रवीण सपकाळ, शुभम बल्लाळ उपस्थित होते.

# सक्षम ती...

**ज्योतिर्मय साहित्य**

सक्षम स्त्री कशी असते? कशी दिसते? आपल्याला ती ओळखता कशी येते? याचे उत्तर एकच आहे. जिचे प्रत्येक पाऊल आत्मविश्वासाने पडते, जिच्या कर्तुत्वाने आगळे वेगळे घडते, तिचा वावरही अनेकांसाठी प्रेरणादायी, उत्साहवर्धक, दमलेल्या देहातही हास्य उमलवणारा असतो, ती असते सक्षम स्त्री. खरंतर ती एका दिवसात घडत नाही तर, त्यामागे तिची विचारधारा, खूप कष्ट, संघर्ष, जिद्द, चिकाटी या गोष्टी समाविष्ट असतात. ठराविक शब्दात आणि वाक्यात ती न मावणारी असते. ठराविक साच्यात आणि मोजमापात तिला घालता येत नाही. परिस्थितीनुसार ती स्वतःमध्येच अनेक बदल घडवत जाते. हा घडवलेल्या बदल मात्र जाणून घेण्यासारखा असतो.

ती कधी परिस्थिती समोर हार मानत नाही. येणाऱ्या प्रत्येक संकटाकडे ती सकारात्मक दृष्टीने पाहते. ती माझ्याच आयुष्यात का आली? असे म्हणण्यापेक्षा मी यातून सक्षमपणे कसा मार्ग काढू शकते. ही परीक्षा म्हणजे माझ्यापुढे आलेली एक नवी संधी आहे असा विचार ती करत असते. आपल्यावर आलेल्या वाईट परिस्थितीचा दोष ती इतरावर देत रडत, कुढत बसत नाही तर प्रत्येक क्षणाचे मोल जाणत ती त्यातून मार्ग काढत राहते. त्या प्रसंगाशी लढण्याचे झगडण्याचे बळ मात्र तिच्यामध्ये असते आणि हे बळ टिकून ठेवण्यासाठी ती सतत चांगली विचारधारा अंगीकारते योग्य विचारांच्या माणसांच्या, पुस्तकाच्या संगतीत वावरत असते. त्यातून तिला आयुष्याची एक नवीन दिशा मिळत जाते.

ती वेळेचे महत्व जाणून असते. आयुष्य खूप थोडे आहे. प्रत्येक क्षण अनमोल आहे. याचा विचार करून प्रत्येक दिवसाचे तिचे नियोजन करते .सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तिचे एक वेळापत्रक ठरलेले असते. त्यामध्ये ती फारसा बदल करत नाही. यामध्ये कौटुंबिक जबाबदारी, व्यावसायिक काम याबरोबर स्वतःची वैचारिक आणि शारीरिक ताकद वाढवण्यासाठी आणि शारीरिक स्वास्थ टिकवण्यासाठी काय करता येईल?याचाही ती विचार करून त्याप्रमाणे ती वागत असते. वाचन, व्यायाम आहार या सर्व गोष्टींचे वेळापत्रक ती तंतोतंत पाळते.नोकरी व्यवसायाच्या ठिकाणीही ती आत्मविश्वासाने काम करत राहते. आपले काम उच्च दर्जाचे कसे होईल याकडे ती जाणीवपूर्वक लक्ष देते. त्यातील येणारी नवनवीन बदल, कौशल्य ती शिकत राहते. नवीन येणारे आव्हानही सक्षमपणे पेलण्याची ताकद तिच्यामध्ये असते.. तिथेही ती आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवून जाते.



इतर स्त्रीसुलभ भावना तिच्यातही असतात. पण ती त्या भावनांचा कधीच विस्फोट होऊन देत नाही. राग, लोभ मोहाचे क्षण टाळण्याचा ती प्रयत्न करते आणि त्यावर ती विजयही मिळवते.संयम,जिद्द, चिकाटी हे गुण तिच्यात असतात. एक एक पाऊल ती पुढे सरकत राहते. इतरांशी तुलना करण्यापेक्षा ती स्वतःमध्ये बदल घडवण्यासाठी धडपडत असते. तिला आवडणारी नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी ती प्रयत्नशील राहते. आपल्या आवडीनिवडी छंद ती जोपासत जाते.प्रत्येक वेळेला तिला यश येतेच असे होत नाही पण तिची धडपड मात्र कायम असते. उगाच नकारात्मक गप्पा मारत ती आपला वेळ कधीच वाया घालवत नाही. त्यापेक्षा हाती असलेल्या वेळेचा कसा सदुपयोग उपयोग करून घेता येईल? याचा ती सतत विचार करत असते.

कोणी तिची निंदानालास्ती केली, अपमान केला किंवा तिला मागे खेचण्यासाठी अनेक मार्ग अवलंबले तरी ती हरून जात नाही. किंवा कोपऱ्यात बसून नशिबाला दोष देत नाही. मी यातून सहज मार्ग काढू शकते असा आत्मविश्वास तिच्यामध्ये असतो. म्हणून ती तिला त्रास देणाऱ्याशी भांडत किंवा वाद घालत बसत नाही. संयम ठेवून ती त्या गोष्टीला सक्षमपणे सामोरे जाते. कधी सडेतोड भूमिका घेते तर कधी दुसऱ्या मार्गाने वळून जाते. जिथे उपयोग नाही तिथे उगाच ऊर्जा वाया घालवायची नाही हा नियम ती स्वतःसाठीच घालून घेते. कारण तिला माहित आहे रस्त्यावर स्पीडब्रेकर हे असणारच. आपल्या कामानेच त्याचे उत्तर ती देत राहते. सर्वांनाच तिचे मिळालेले यश पचनी पडेल असे होत नाही अनेकदा तिच्यातील आत्मविश्वास कमी करण्यासाठी अनेक कावे रचले जातात. मग हे कावेरचन्यामध्ये अनेकदा तिच्या कुटुंबातील, आणि नातेवाईकामधील लोकही सामील असतात.




तर कधी बाह्य परिस्थितीचा ही तिला सामना करावा लागतो. पण ती खचून जात नाही. किंवा त्यांच्याशी वादही घालत नाही. आपण केलेल्या उपकारांचा पाढाही त्यांच्यासमोर वाचत बसत नाही. कोणाला किती जवळ ठेवावे याचा धडा तिला यातून मिळत जातो. उलट माणसे पारखण्याची कला तिच्यामध्ये येत जाते आणि गोड बोलून धोका देणाऱ्या माणसांपासून ती लांब राहणे पसंद करते.

आयुष्य खूप सुंदर आहे हे ती जाणून असते. कधी निसर्गाच्या कुशीत स्वतःला शोधत राहते तर, बेधुंद पावसाच्या सरीत मस्त नाहून घेते. स्वतःच अंतरीचा तळ शोधत राहते. सरले किती आणि उरले किती याचा हिशोब तिच्याकडे असतो. मी या पृथ्वीतलावर शाश्वत नाही याची जाणीव तिला असते. हा मिळालेला मानवी देह आणि आयुष्य सार्थकी कसं लावता येईल याचा ती विचार करत राहते. तिच्या आयुष्याचे योग्य नियोजन असते. कौटुंबिक व्यावसायिक आणि तिचे स्वतःसाठीचे योग्य नियोजन असते. भविष्यकाळात माझे कसे होईल? मी मुलांसाठी या गोष्टी करू शकेल का ? माझ्या कुटुंबीयांच्या माझ्याकडून असणाऱ्या अपेक्षा. या गोष्टीवर सतत विचार करण्यापेक्षा ती योग्य मार्ग काढत राहते.

दुसऱ्यांच्या अपेक्षाचे ओझे ती आपल्या डोक्यावर वाहत नाही किंवा आपल्या अपेक्षा दुसऱ्यावर लादत नाही.. चिंता, दुःख करत राहण्यापेक्षा ती वर्तमानात जगत राहते. आयुष्य खूप थोडे व अनमोल आहे हे जाणून प्रत्यक्ष क्षण भरभरून जगते. फुलांचा सुगंध श्वासात भरते. मातीत मिसळतानाही आपण सुगंधित होऊन जावे, थोडी फुले इतरांसाठी विस्कटवीत अन भरभरून आनंद उधळावा एवढीच तिची मापक अपेक्षा असते.

वाट असेल वळणांची
कधी कोसळेल आकाशही
तू मात्र चालत रहा
सकारात्मकतेचे गाणे
गात जा.....

# लग्न म्हणजे स्पर्धा नव्हे

**ज्योतिर्मय साहित्य**

कला १० वीत खूप चांगल्या मार्कांनी पास झाली. पण घरची बेताची परिस्थिती असल्यामुळे तिच्या पुढील शिक्षणाचा खर्च झेपत नसल्यामुळे घरच्यांनी कलासाठी स्थळं पाहायला सुरुवात केली. बघता बघता अवध्या १५ दिवसात कलाचं लग्नही झालं. कलासाठी सगळं कांही नवीन होतं. कलाच्या आणि तिच्या पतीच्या वयामध्ये चक्क १० वर्षांचा अंतर होता. कलाची सासू अतिशय तापट, नेहमी रागात बोलणारी, प्रत्येक कामात उणीदुनी काढणारी, शल्य बोचतील असे टोमणे मारून बोलणारी. कला १६ वर्षाच्या उंबरठ्यावरील फुलत असलेली नवी वल्लरी होती.

आणि ही कोवळी वल्लरी वळणदार वळणे घेण्याआधीच तिची वाढ खुंटवली गेली. कोवळ्या वयात नको तेवढ्या वजनदार आणि न पेलणाऱ्या जबाबदाऱ्या आणि त्या जबाबदाऱ्यांचं ओझं कलाच्या खांद्यावरती येऊन पडलं. कलाचे वय वर्षे १६ आणि कलाची सासू कलाकडून वय वर्षे ५० असलेल्या बाईसारखी अपेक्षा करत होती. कामात कुठलीही चूक न करता कलाने प्रत्येक काम अगदी चोखपणे करावं. ही भली दांडगी अपेक्षा होती कलाच्या सासूची. नाजूक वेलीवरच्या कळीसारखा नवा आणि नाजूक संसार. आणि कला आतापासूनच सासूच्या कडेकोट बंदोबस्ताखाली राहत होती. पोटासाठी सुखाचे चार घास, पुरेशी झोप, आराम, घरातील प्रसन्न वातावरण यापैकी कुठलीच गोष्ट घरात समाधानकारक नव्हती. घरात नेहमी चिडचिडे पणाचं वातावरण, ओरडून बोलणे, कामावरून वाद जणू याच गोष्टी घरात नांदत होत्या.






कोणतेही काम करताना कलाची शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक तयारी नव्हती. इतकी कोवळी होती ती. कलाच्या हातून एखादे काम बिघडले वा चुकले की सासू लगेच म्हणत असे, ''जा माहेरी, तुला एक काम थड करता येत नाही''. शिवाय रडण्याच्या कलाकडे इतर दुसरा पर्याय नव्हता, कला दिवसभर उपाशी पोटी तशीच ढीगभर कामं करत असायची. कलाच्या सासूच्या कलाकडून पावलो पावली अपेक्षा होत्या. कला प्रत्येक कामात खरी उतरावी सासूला नेहमी असेच वाटत असे. आपल्या नवीन घरात आलेल्या आपल्या सुनेला आपण कसे वागवावे?, आपलं घर तिच्यासाठी नवीन आहे, घरातील गोष्टी तिला कशा पद्धतीने समजून सांगाव्यात, घर कामात ती रुळेपर्यंत आपणही थोडासा हातभार लावून तिला मदत करावी, कोणते काम कसे करावे? हे तिला रोज नीट समजून सांगावे. कलाची सासू या गोष्टींचा तिळमात्र विचार करत नव्हती.

**(क्रमशः)**

## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण भाग 3



शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

### विष्णुपुराणातील विश्वरचना : एक प्राचीन विश्वदृष्टी

भारतीय पुराणपरंपरेतील विश्वरचनेचा विचार करताना विष्णुपुराण विशेष महत्त्वाचे ठरते. या ग्रंथात सृष्टीची उत्पत्ती, तिची रचना, कालचक्र, विविध लोक, द्वीप-वर्षांची कल्पना तसेच सूर्य, चंद्र, ग्रह आणि नक्षत्रे यांच्याशी संबंधित वर्णने आढळतात. त्यामुळे प्राचीन भारतीयांच्या विश्वकल्पनेचा अभ्यास करण्यासाठी विष्णुपुराण एक महत्त्वाचा प्राथमिक स्रोत ठरतो.

विष्णुपुराणातील विश्वकल्पना आधुनिक खगोलशास्त्राप्रमाणे गणितीय-सैद्धांतिक पद्धतीने मांडलेली नाही. ती धार्मिक, तात्त्विक, प्रतीकात्मक आणि खगोलविषयक कल्पनांचा एकत्रित पट आहे, म्हणून त्यांचे मूल्यमापन करताना प्रथम ग्रंथ नेमके काय सांगतो हे पाहणे आवश्यक आहे.

भारतीय परंपरेत विश्व हे स्थिर आणि एकदाच निर्माण झालेले नसून सतत निर्माण, स्थिती आणि लय यांच्या चक्रातून जाणारे मानले जाते. सृष्टीची उत्पत्ती, तिचा विस्तार, तिचा कालावधी आणि तिचा पुन:पुन्हा होणारा लय, या सर्वांचा विचार अत्यंत विशाल कालमानांच्या संदर्भात केला जातो.

या विश्वरचनेत पृथ्वी ही एकटीच अस्तित्वात असलेली वस्तू नसून, तिच्याभोवती आणि तिच्यापलीकडे विविध स्तरांची कल्पना केली आहे. सूर्य, चंद्र आणि ग्रह यांचे स्थान या विश्वरचनेत विशिष्ट क्रमाने मांडलेले दिसते. त्यानंतर नक्षत्रमंडल, विविध लोक आणि त्याहून व्यापक विश्वरचना अशी कल्पना पुढे येते. येथे एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यावा लागतो. 'ग्रह' हा शब्द आधुनिक खगोलशास्त्रातील प्लॅनेट या अर्थाने नेहमीच वापरला जातो असे नाही.

भारतीय ज्योतिष-खगोलपरंपरेत 'ग्रह' ही संज्ञा आकाशातील विशिष्ट गतिशील ज्योतिर्वस्तूंसाठी वापरली गेली आहे. सूर्य आणि चंद्र यांचाही 'ग्रह' या व्यापक संकल्पनेत समावेश होतो. त्यामुळे प्राचीन ग्रंथातील 'ग्रह' आणि आधुनिक वैज्ञानिक वर्गीकरणातील प्लॅनेट यांची थेट समानता करणे टाळले पाहिजे.

विष्णुपुराणातील विश्ववर्णनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्तरबद्ध विश्वरचना. एका स्तरानंतर दुसरा स्तर, त्यानंतर पुढील आकाशीय किंवा लौकिक स्तर, अशा प्रकारे विश्वाची कल्पना केली जाते. ही रचना आधुनिक अवकाशातील त्रिमितीय ग्रह-ताऱ्यांच्या प्रणालीपेक्षा भिन्न आहे. तरीही या वर्णनांकडे दुर्लक्ष करण्याचे कारण नाही. उलट, ते आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारायला भाग पाडते, प्राचीन भारतीय मनुष्याने आपल्या सभोवतालच्या आकाशाचे आणि विश्वाचे आकलन कोणत्या चौकटीत केले होते?

आकाशातील सूर्याचा नियमित प्रवास, चंद्राच्या कला, ऋतूंचे चक्र, नक्षत्रांचे निरीक्षण आणि ग्रहांची हालचाल यांचा प्राचीन समाजाच्या जीवनाशी थेट संबंध होता. कृषी, कालगणना, यज्ञ-विधी, उत्सव आणि धार्मिक आचार यांसाठी आकाशीय निरीक्षण महत्त्वाचे होते. त्यामुळे आकाशाकडे पाहणे हे केवळ धार्मिक कुतूहल नव्हते; ते दैनंदिन जीवनाच्या व्यवस्थेशीही जोडलेले होते. (क्रमश:)

# कै. केशवराव नांदेडकर यांच्या जीवनातून समर्पित वृत्तीने कार्यरत राहण्याची प्रेरणा मिळते-दिलीप क्षीरसागर

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : समर्पित वृत्तीने सतत कार्यरत राहण्याची प्रेरणा कै. केशवराव नांदेडकर यांच्या जीवनातून मिळते असे गौरवोद्गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कार्यकारीणी सदस्य दिलीप क्षीरसागर यांनी येथे कै. नांदेडकर यांच्या श्रद्धांजली सभेत बोलताना काढले.

रा. स्व. संघाच्या वतीने आयोजित मुळ धुळे व सध्या सिंहगड भागात वास्तव्यास असलेले संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. नांदेडकर यांच्या श्रद्धांजली सभेत बोलताना क्षीरसागर पुढे म्हणाले की, संघटन व समाज परिवर्तन या दोन्ही कामांमध्ये त्यांनी आपला ठसा उमटवला होता. होशंगाबाद (मध्य प्रदेश) येथे पूर्णवेळ संघ प्रचारक ते गृहस्थी जीवनातील धुळे जिल्हा व देवगिरी प्रांत या कार्यक्षेत्रात संघाच्या विविध जबाबदाऱ्यांमध्ये परिश्रमाने संघकार्य वाढवण्याचे काम त्यांनी केले.

स्टेट बँकेतील अधिकाऱ्यांची संघटना बांधण्यात त्यांचा संस्थापक म्हणून मोठा वाटा होता. निवृत्ती पश्चात त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतील पूर्वांचलातील मिझोराम




राज्यामध्ये राष्ट्रीय विचारांचे काम उभे करण्यासाठी त्यांनी काम केले.

धुळे परिसरातील विविध संस्थांमध्ये देखील त्यांनी पदाधिकारी म्हणून काम केले. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या संघ कार्यकर्त्यांचा आदर्श स्वयंसेवकांसमोर कायम राहील असे क्षीरसागर म्हणाले.

कौशलम न्यास

ज्येष्ठ निवृत्त सनदी अधिकारी डॉ. लिना मेहेंदळे यांनी नांदेडकर कुटुंबाशी तीन पिढ्यांपासून असलेल्या आठवणींना उजाळा दिला.

कौशलम न्यासाला त्यांचे कायम सहकार्य मिळत असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

नॅशनल मेडिको ऑर्गनायझेशन

एन.एम.ओ.च्या वतीने डॉ. शरद अगरखेडकर यांनी कै. केशवराव यांच्या राष्ट्रीय संघटन बांधणीत व विशेषतः उत्तरांचल मधील कार्यातील सहभाग, कार्याविषयी निष्ठा व कार्यपूर्ततेचा ध्यास याविषयी मनोगत व्यक्त केले. विविध वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संघटनेचे काम पोहोचवण्यात कै नांदेडकर यांनी परिश्रम घेतल्याचे त्यांनी सांगितले.

स्टेट बँक ऑफ इंडिया अधिकारी संघटना

स्टेट बँक ऑफ इंडिया सहकारी परिवाराच्या वतीने विश्वास कुलकर्णी यांनी निवृत्ती पश्चात कै केशवराव यांनी स्टेट बँकेतील निवृत्त अधिकारी -कर्मचाऱ्यांचे संघटन बांधून विधायक कार्यासाठी प्रेरित केल्याचे सांगितले

पुणे निवासी धुळेकर

पुण्यातील धुळेकर बांधवांच्या वतीने कै केशवराव यांचे धुळ्यापासूनचे मित्र विश्वास ओढेकर यांनी कै. केशवराव यांच्या संघकार्याविषयी तसेच व्यायाम व क्रीडा प्रेमाविषयी अनुभव संगितले.

कुटुंबिय

नांदेडकर कुटुंबियांच्या वतीने त्यांचे पुत्र आशुतोष यांनी वडिलांच्या मार्गदर्शन व पाठबळाविषयी आठवणींना उजाळा दिला.

सौ. कीर्ती कस्तुरे यांनी प्रारंभी दोन भजने व समारोप शंकराचार्य रचित निर्वाणषटकाचे उच्चारण केले.

यावेळी सिंहगड भाग संघचालक सचिन नागपुरे,विवेकानंद नगर संघचालक दिलीप कस्तुरे, प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे, डॉ. शरद कुंटे,नांदेडकर यांची कन्या अनघा आठल्ये व कुटुंबिय तसेच समाजातील मान्यवर उपस्थित होते.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559